
नाताळ २५ डिसेंबर २०१७

# कादोडी

सव्वा वहरी दुहरो अंक

(खाजगी वितरन)



# कादोडी

**नाताळश्या हनाव विशेषांक**

**२५ डिसेंबर २०१७**

साव्वा वहरी दुहरॉ अंक

एकून तेरावॉ अंक

खाजगी वितरन

## या अंकात .......

संपादकीय
पटल्या !! – नेल्सन डिमेलो
क्या खायेगा? (खायदा का?) - सिरील मिनेझीस
कविता - प्रेम पत्र – सेविन तुस्कानो
कविता - हाउ-ओ सा नाता - केतकी अभिजीत वझे
फुयो – संगीता वाझ
गुल्या मिस्तेरी - क्लेमेंट डिमेलो
"आय.. फोनवाळी आय" - बर्नड लोपीस
आपलॉ पयलॅनसॉ काळ – कॅरॉल डिकोस्टा
ख्रिसमस स्टार (तारॉ) – इनास तुसकान
ऑहॉ पन इंटरव्यु – पेट्रेशिया पिटर गोन्साल्वीस
हैरा आन लगीन - सचिन रॉड्रीग्ज
वालाआ गॉळाइ भाजी – हेडविजेस रुमाव
रेसिपी - ॲलेक्स मच्याडो.
कविता – मेरी आल्मेडा
कादोडी शब्दकोडा – सॅबी परेरा

**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान किंवा आपलॉ या अंकाविषयीसा मत, तुमाला का आवडला, का नाय, ता आमाला जरूर कळवा. बाजूला दिलेल्या ई-मेल आयडीवर ई-मेल करा किंवा संपादक मंडळाश्या कनालाही भेटा.

**संपादक**

ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**सहसंपादक**

एडवर्ड डिसोजा

**संपादक मंडळ**

सायमन रॉड्रिग्ज
सुनील डिमेलो
डॅनियल मस्करणीस
रॉबर्ट फर्नांडिस
राजन डिमेलो
जेम्सन डिमेलो
रॉबिन्सन डिमेलो
वॉल्टर तुस्कानो
तेरेजा डिसोजा

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :-** www.onevasai.com

**मुद्रक :-** मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व – ९७६५८७४४९३

**सूचना:-** 'कादोडी' या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय द्यासा हायर्दे तॅ **kadodivasai@gmail.com** याओरती धाडा नातॅ संपादक मंडळाला भेटा.

जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तहॅस बरा-वाईट मत देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांअॅ आमॅ खूप आभार मानत्याव.

**नाताळसॉ हन जकल्या वाचकांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अह्यो शुभेच्छा.**

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायर्दस आहा नाय.**

संपादकीय १

## सोशल मीडिया एक न्यायमंडळ

जकल्यांना नाताळश्या हनायो खुब खुब सुबेछा.

जन्मा आलॅल्या परत्येका मनात घोळांना सालु आहातॅ, 'माला न्याय पाय, माव हारकॉ न्याय जालॉ नाय.' न्याय मंग तॉ कुटुंबाऑ गा, गावसॉ गा, भाट्शा जमिनीऑ, समाजाऑ अहो गा संस्थेऑ अहो, आपल्यात मारॅ सालूस. मंग का न्याय करा. तर अहो न्याय कऱ्या पयल्यान गावशे वडील मंडळी आहतोती. पंचायत ओथी. देवळा देवळा न्यायकरी ऑथॅ. आन तडे न्याय नायुस मिळालॉ तॅ मंग कोर्ट ऑथा... शॅवटाऑ पर्याय. शिक्षान वाडला. लोक सुदारला. समाज बदलात गॅलॉ. जग बदालला. आन मंग पयल्याहारकी न्याय मागॅशी रीत कमी जाली. आतॅ नाखॉडा कयजरी जाला गा गेले कॉर्टात आन मंग वकीलादरी खेपो ऑथ्यात.

आतॅ तर सोशल मीडियाऑ वापर ऑडॉ जालॅ गा राती राती पोत लोक जागा आहातॅ. कडे कय जाल्ये हायदॅ तॅ ता पटकान शे-दोनशे माहनापोत मिनटात पॉसातॅ आन मंग तडे न्याय हॉया सुरवात ऑथॅ. दा-बारा जनांना एखादा मत पटला गा तॅ ता तास खरा हुम्जॉन लोक पुडॅ जात्यात... पन त्या मागशी गोष्ट आन पुडॅ का हॉयदॅ याव विसार करी नाय आन एकमॅकाना ता पसरविला जात्ये. त्योरनॅ एखाद्या व्यक्ति,संस्था, गाव याव न्याय कॅलॉ जातॅ. खास करॉन आपल्या समाजाशा तरुन पोरांविषयी सोशल मीडियावर बॅताम बातचीत ऑथॅ.. तॉ पयल्यापासून तहॅास हाय, त्या अडे लफडा जाला, त्याये बय-बाबा तहेस हात आन खुब कय बोयला जातॅ. "एखाद्या हैरा जाला नाय, जालेला हैरा हुटला नातॅ एखाद्या लगीन जालॅ पन अमुक अमुक लफडा जालॅ." बॅताम टेकेसा (प्यासा) काम करतॉतॉ, हैरा हुटला गा पोरी बाबतीत पन आहास, बी वधार पन कमी नाय, नातॅ लगीन जाल्योर पोरी थोडॅ घनॅ दि मायारा रेली बास तव लॉकांना वास या सुरवात ऑथॅ आन मंग सोशल मीडियावर त्याव न्याय कऱ्या सुरवात ऑथॅ. जा वाशिल्योर बॅताम मजा येतॅ आन तॉ विषय ओबडॉ चर्चिलॉ जातॅ तॉस लॉकांना खरॉ वाट्या लागातॅ. कुना कय गाइ नहातॅ पन मॅ त्योरशे लॉकाई मांडीलॅलॅ विसार वासॉन मॅ आपलॉ बॉलॉन मॉकळॉ ऑथॅ.. मॅ माला जाहा पटला वाटला तहॉ न्याय करतॅ. पन माला ऑ न्याय करॅसॉ अधिकार हाय गा? कुनॅ दिले? ओ प्रश्न आज प्रत्येकानॅ सॉताला विसऱ्याशी गरज हाय..

---

संपादकीय २

## अभिनंदन

मंडळी, आपलॉ कुपारी समाज कुहन्यास गोष्टीत मागॅ नाय, गेल्या वहारा मॅ जकलॅ कलाकार आन लेखक-कवी याविषयी माआ एक स्वप्न होता त्याविषयी अडे लीविलता आन आज माला आपल्या समाजाश्या विशेस रत्ने जे चमक्या लागल्यात त्याविषयी अभिनंदन कऱ्यासा हाय. भुईगावसॉ माल्कम डायस पयला एनडीए पूर्ण केला आन आतॅ भारतीय वायुसेनेत फ्लाईंग ऑफिसर जालॉ. खिवनी, नंदाखालसॉ विनीत परेरा भारतीय लष्करात लेफ्टनंट झालॅ, दोनतलाव, नंदाखालसॉ फ्रॅंकलिन डिमेलो मेजर जालॅ आन आर्मीश्या फ्लाइंग विंगमिनॅ पायलट हाय. त्यासबरोबर पडई, नंदाखालशी वेलेरी लोबो यीनॅ राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत ब्रॉझ पदक मिळविला. सांबोडी, आगाशीसॉ प्रिंसली परेरा क्रिकेटश्या अन्डर १७ प्रकारामिनॅ चमक्या लागलॅ आन दोनतलाव, नंदाखालशी झील डिमेलो यीयी मुंबई क्रिकेट असोशिएशनश्या १६ वहराखालश्या टीममीनॅ निवड जाले. एरिक लोबोशी निवड बीजिंग (चीन) शहरात झालेल्या जागतिक युवा संसदमिनॅ जालती, आशीष लोपीस यांशी सहकार मंत्रालयात उपसचिव भगून नियुक्ती जाले. आपल्या समाजानॅ खुब प्रगती केले, अनेक क्षेत्रामिनॅ खुब ऊंची गाठीले, खाजगी कंपन्यामिनॅ भोट्या पदोर आपले तरून पोसल्यात. बिझनेसमिनॅ पन खुब जनाई भोटी मजल मारले. फक्त एकुस खंत हाय, आयएएस-आयपीएस अजून कुन झालॉ नाय, आपले पोरे त्यात पन कमाल करद्यात अही आशा हाय. कायिक जन त्या तयारीला लागल्यात, त्यांना खुब खुब सुबेछा, कादोडी संपादक मंडळ आपल्या पाठीशी हाय आन मदतीला पन हाय. आपल्या समाजायी अहीस प्रगती होत रेवो आन आपली संस्कृती टिकॉन रेवो...

आपल्या जकल्यांना परत एकदा नाताळश्या हनायो खुब खुब सुबेछा.

## **पटल्या !!** – नेल्सन डिमेलो, जवतळा, नंदाखाल

आमशा गावात पटल्या नावासॉ माहानु हाय, अहा एक पान लगीन नाय गा पटल्या नावळ आढ्या गॅलॉ नाय. नुसतॉ जासॉ नाय तॅ प्रत्येक लगीन न नावळ पटल्या गाजव्यासॉ. ऑहॉ पटल्या तिगाळा प्रत्येक गावात एक अह्यासॉ पान आमसॉ पटल्या कय वायलॉस.

२० एक वहरा पुडनॅ आमशा गावात बारक्याआ लगीन ऑथा, मॅ नावळ आढ्या जा लागलोतॉ ताव माला पटल्या भॅटलॉ. आमॅ दोगे नावळ आढ्या जा निंगाले. पटल्या हांगातॅ, "बारक्यां हारोडी जकल्ये निंबू सोके, आपली कय सोय तडे हॉनार नाय तॅ आपुन उंबरगोठनला गोपाळशा बार मीनॅ थॅाडॉ शा पाणी करॉ आन पुडॅ जाव." मॅ मन कवळा कॅला आन आमॅ दोगे गोपाळशा बार मीनॅ खिरले. मॅ बीअर मांगविली आन पटल्यानॅ पावशेर. पटल्यानॅ ढमा ढम दोन पेग मारलॅ. बिल मालास द्या लागनार ऑथा तॅ पटल्यानॅ संधी बगॉन बी एक पावशेर मांगविली. मॅ विसारला, "पटल्या बी कादो रॅ?" "आरे रस्त्यात नासॉन उतरली तॅ एक ठोयेतॅ खिशात वखताला". माला पटल्या नॅ बरा २५० / ३०० रुपाला घायला. आमॅ दोगे निंगाले. नावळ ताव हिर्लयशा खुरसॉर आलती. पटल्याला बगीता खोटी बोंबो पडल्यो. गावशा नासनाऱ्या पोरां आंगात जही सैतान आला. पटल्या मनजॅ जक्ल्यांव लिडर ना !! जकले नासनारे खूश पान पटल्याला बगॉन बारक्याला घाम आलॉ. आतॅ पटल्या कूना हरी कळ घालदॅ त्याव नेम नाय. पटल्याला पोरांई पयला टूकिला आन मंग पटल्या हांगन्योरनॅ पटल्यानॅ आन पोरांयी माला पान टूकिला.

आतॅ पटल्यानॅ चार्ज घॅटलॉ आन नवरा नवरीला ठॅपॉन नाश्या लागलॉ. रस्त्यात कुनॅ नवरा नवरीला लेमन फोड्लॉ गा नवरीया आन नवऱ्या तोंडसॉ रॅलॅलॉ घ्यादो पटल्या ऊबॉ. एकदा तॅ नवरीनॅ घोट मारॅशा पूडनॅस पटल्यानॅ तीआ हातसा गलास तानला पान पटल्याला बॉल्याशी हिंमत कूनाला हाय? मंग ता ग्लास घॅऑन पटल्या पटकान नावळीया मांगे जासॉ आन खिशासी पावशेर लेमन मीनॅ वाळॉन टंमकान मारॅसॉ. नावळ गावशा वेहीवोर यादो पटल्या फुल टाइट. पटल्या नावळ एक पाऊल पुडॅ सलॉन दे नाय. नवरा नवरीया आंगात खिरॉन नासातॅ. रातशॅ १० वाजलॅ. पटल्याला बॉल्याशी कुनाला हिम्मत नाय. महानु धीप्पाड आन त्यात फुल टाइट. कून सल्या हांग्या गॅला गा जाम तुफान करतॅ बास. बारक्याला आयके नाय. नवरी आन तीया मांगशो करवल्यो पटल्याअॅ नाटक बगॉन वितळॉन गेलत्यो. नवरीया पायोर पटल्यानॅ एकदा पाय दिलतॉ तॅ तिया बिचारीया डोळयांत पाणी आलॉ आन नवरीआ डॉळयात पाणी बगॉन बारक्याअॅ डॉळॅ पानावलॅ. नवरी आतॅ बारक्यापेक्षा २ फुट मांगे उभी रेतोती. बाजॅवाळॅ थकलॅ. आख्खॉ गाव वेहीयोर आलतॉ.

सब्बान गावशे वडीलधारे लोक पटल्याला दादा, बाबा करॉन विनंती करतोते गा, नावळ घराय जाऊंदे, मंग तू नास मांडवात कॉडॉ नाशॅ तॉडॉ, पान पटल्या कुना भगून आयके नाय. बारक्यां आन त्या नवरी एकमॅकोरं डॉकायत्यात आन जही डॉळ्यांन बॉलात्यात "रात गावशा वेहीयोरूस जाय ऑहॉ रंग दिखातॅ" ता बगॉन माला बारक्यांयी दया आली, आन मॅ पटल्यां गप्साट धरलान जॉराअॅ हामकॉन हान्नीला, "पटल्या !! खूब जालॅ हां तूअॅ नाटक, आतॅ सलॅ गा मुकाळळॅ?" ताव पटल्या जॉ निन्गालॉ तॉ उबी रॅदो सरळ मांडवात. बारक्या आन त्या नवरीला आतॅ जरा आशा जाली. आख्खॉ गाव विसारात पडलॉ. ऑ पटल्या कुनाला नाय आयकालॉ आन या अॅनॅ का जादू केली गा पटल्या खाला मुंडी घालॉन निंगालॉ, खरा गुपित शेवटपर्यंत कुनाला उलगडला नाय. मॅ मनात केला "२५० रुपय माअॅ गॅलॅ पान पटल्या माला पटलॉ". पूडशा दोन शार आयतवारशा लग्नावाळयां घरशांयी मा हातात हात दिलॉनं बोयले "गावात पटल्याला सलता करनारॉ एक उत्पान जालॉ." मॅ मनात बोयलॉ "तूमशा मायला, प्रत्येक आयतवारॅ पटल्योर खर्स करॅआ माअॅ पैशे वरती आल्यातांआ? रॅत नायी नवरा नवरी आख्खी रात वेहीयोरू..

## **क्या खायेगा? (खायदा का?)** - सिरील मिनेझीस, माडीभाट, आगाय

बातमी तही खुब जुनी हाय ,१९७७-७८ सालशी. तीगाळा आकाशवाणीआ झुमरीतल्लया या केंद्रोरनॅ विविध संस्कृतीया खाद्य खादाड भारतीयाना माईती मिळावी भगुन वॅंगवॅंगळया ठिकानशा खाद्याई रेसिपी हागंनारॅ एक प्रोग्रॅम प्रसारीत हाँयासॉ या अंतर्गत एकदी आपल्या कुपारी संस्कृतीआ आवडता, जिव्हाळ्या खाद्य मिनजॅ "हुक्या बुबलाआ" आटवान. याई रेशिपी आमशा शिजूबायनँ हिंदी मिश्रीत कादोडीत कही हांगीलती इ मँ हॉडॉन कुनालास माईत नाय. ज्या दिहा या कार्यक्रमाआ प्रसारन जाला तीगाळा नेहमी परमानॅ लाईट गेलती, त्यापायान जॅआ दरी भाँठँ वालवालँ रेडीओ हाँतँ तँ मुकाळँ भँलतॅ. ज्या दरी सेलवालँ ट्राजीस्टर हाँतँ त्यावर झुमरीतल्या स्टेशन पकडीतूस नाँता. आतॅ या कार्यक्रमाई ध्वनीफीत पान उपलब्द नाय. आतँ इ जकला वाशीलँओर तुमाला शिजूबायसाँ आँ कार्यक्रम आयक्याशी इच्छा जालँ हायदँ . कय हरखत नाय आयक्या नाय मिळाला भगुन का जाला ? वाशा तँ नक्की मिळदँ.

निवेदक : नमस्कार! आजके इस "क्या खायेगा? मॅ आप सभीका भरपेट स्वागत! उम्मीद है, आपको हमारा ये कार्यक्रम पसंत आता होगा. तो आजके इस कार्यक्रमकेलीये हमारे स्टुडीओमॅ उत्तर वसईसे "हुक्या बुबलाका आटवन" बनानेके लीए आई है शिजू और ऊशी. आपका स्वागत है! (मांगँ पापोळयो कुटील्याव आवाज येतॅ.)

शिजू : कॉडला का ला बॉलातँ?        ऊशी : आपल्या दोगीआ स्वागत कँला.

निवेदक : तो शिजूबाय आप हुक्या बुबलाका आटवान कैसे बनाते है! ये हमारे दर्शकोको बताईये.

शिजू : कॉडला का ला बॉलातँ?        ऊशी : आटवान कहा बनव्यासा ता तुला हांग्या हांगातँ ताँ.

शिजू : हांगातँ गनाय घाभरातँ गा का मँ ? हा पन पयलास हांगॉन ठेवताय, मँ आटवान बनवा आन धान खुटा तँ माला कय मत सांगो. माआ काना बिल्ला टॉस.

निवेदक : शिजूबाय आप शुरु किजीये.

शिजू : कॉडला का ला बॉलातँ ?        ऊशी : आटवान कहा करँसा ता हांगँआ हांगीतँ तॉ.

शिजू : आँ उपाय आssलँ गा का ? जिव्याशी ऊतळी पडलँ ती याला.        ऊशी : बाये, तू हांग्या सुरवात तँ कर.

शिजू : हांगातँ गनाय ,घाभरातँ गा का ? मंडळी जकल्यात पयला तिजाल घेनेका. मंग शारपास हुक्यँ बुबूल घेनेका, काड्यो नही हा भाँठँ भोठ्यँ बोमपोलीस बुबूल लेनेका. ऊसके कुडके करनेका आन पाणीमॅ भिजवनेका. मंग कांदाँ आन तांबोटा बारीक बारीक चिरनेका. (शिजू इ हांगीताना ऊशी इ तहास आटवान बनवितोती. पान रेडीओर कय ती दिख्याशी सॉय नहल्यामुळँ फक्त कुंद्याराव (समशाव) खडखाड आवाज तॉडाँ यतोतॉ.)

शिजू : पयल्या शुटला सुल धडाक आबत्याशी. सुलीओर तिजाल ठॉअॅसा. मिंगँ त्यात गोडेतँल टाक्यासा तँल टाक्यादो कंजूसगीरी करॅशी नाय. तँल गराम जाला गा हिरवी मिर्ची/मिरी, आला आन लसून/लहन घँऑन पाट्योर वाट वाट वाटनेका आन फस्कान वाटानका फोडणी देनेका. लगेस कांदॉ आन तांबोटा टाकनेका आन घाट घाट घाटने का. कांदाँ ताबोटा हिजनेके बाद बुबलाके कुडकँ पान टाकनेका. मिंगँ बतात आन वांगेका फोडी करनेका, फोडीपान तिजालात टाको. मंग मिठ आन मसाला टाकके परत एकदा घाट घाटके तिजालके ऊपर पान्याकी बशी ठेवनेका. और पंदरा मिनटे हिजवने का.

निवेदक : शिजूबाय यहा रूकीये.        शिजू : इ कोडला का ला बोलातँ ?     ऊशी : तूला थांब्या हांगातँ.

शिजू : आला पान अजून आटवान जालँ कडँ ? याला ऊतळी कॅऑई पडलँ.

ऊशी : आला ताँ विहांबो घँ हांगातँ.    शिजू : आला पन आटवान बुडाला लागँदॅ गनाय.

ऊशी : तू सुलीखालशी पासर बायार काड बास.

(मंग कय जायरती लागल्यो, प्रकाश माक्याचे तॅल "आईगं वैतागले मी या केसाला." स्टँपसील, वाँशीगं पावडर निरमा, लिज्जत पापड. अह्यो जायरती जाल्यो आन माकुन कार्यक्रम सुरू जालो.)

निवेदक : क्या खायेगा मॅ आपका फिरसे स्वागत, आज अपने साथ है, शिजू और ऊशी. और वो बनाने जा रही है लज्जतदार, मसालेदा वेरी वेरी टेस्टी " हुक्या बुबलाका आटवान ." तो शुरू किजीये शिजूबाय.

शिजू : इ कोडला का ला बोलातँ?      ऊशी : तूला पुडसा हांग्या हांगातँ.

शिजू : पयली पासर माकून आबतनेका. लिगरीशी शिस घेनेका आन पानीमे निस निस निसनेका आन नाखाँडा कालवन मिनजॅ आमटी बनवनेका. आन मिंगँ आमटी आटवानात टाकनेका. आन आटवान गडगडँ ऊकळनेका. आटवान जाड बदाक होने तक ऊकळनेका . जाला आटवान.

निवेदक : हो गया आटवान ? हमारे समझमॅ कुछ नही आया, लेकीन बास बहुत बढीया आ रही है!

शिजू :, इ कोडला का ला बोलातँ?      ऊशी : त्याला वास आवाडलँ, तू पटकान साऊळ वैरू. धान जाला गा तॅला पयला जिव्यादो भँवडॉ.    शिजू : मंग का ? खायदा का ?

(आड्ये परत एकदा ब्रेक. आन दिल्ली केंद्रोरनँ प्रसारीत होनारे कादोडी बातम्यो सुरू जाल्यो.) ब्रेक नंतर, निवेदक आटवानाय जिवीता जिवीता बाँलातँ )

निवेदक : शिजूबाय ,ऊशीबाय धन्यवाद आज आप हमारे स्टुडीओमे पधारे और बढीया रेसिपीसे परीचीत करवाया " हुक्या बुबलाका आटवान " मस्त और वेरी वेरी टेस्टी, बोलो क्या खायेगें आप ?      शिजू : नही नही . मेरे मांगे बोलो, " खायदा का?"

निवेदक : खायदा का? तर मंडळी नमस्कार! परत भँठो, अह्यास बी कार्यक्रमात नविन कुपारी खाद्य बनव्यादो, तो पर्यंत, "जय कुपारी"

शिजू : इ कोडला का ला बोलातँ ?     ऊशी : आला शिजू इ कॉडला आपल्या अडसास दिखातँ.

## बिशा कुपारीसा अनू कुमारीला प्रेम पत्र – सेविन तुस्कानो, नंदाखाल

तु तपयली मॅ भुङ्टॉ तु दारू मॅ अड्‌डॉ
तु हुतळ मॅ हड्‌डॉ तु रस्त्तॉ मॅ खडॉ
कते निरोप धाडॉ

तु देऊळ मॅ घाट तु बावखाल मॅ राट
तु पानी मॅ हाट  तु हुंबडी मॅ खाट
लाऑ नाका माई वाट!!!

तु परकर मॅ नाडी तु हालतॉ मॅ काडी
तु भोळी मॅ वाडी तु नाबी मॅ दाढी
तु मावरा मॅ खाडी जमॅदे गा आपली जोडी...???

तु करजी मॅ पुरान तु लॉनसा मॅ वरान
तु आंबाडॉ मॅ हिरान तु आंबॉ मॅ दगड
तु माळ मॅ बेगड तु बरशी मॅ हरप
तु पाती मॅ ओरप तीनदा परत धाडलॉ माऑ निरोप!!!

तु राय मॅ दिट तु खडी मॅ इट
तु लॉगरा मॅ बॉन्ड तु पावडर मॅ तॉंड
तु कोंबडी मॅ हाळम्बॉ तु दोपार मॅ विहाम्बॉ
शाळीसाव जालॉ अजून कोडो थांबॉssss

## हाउ-ओ सा नाता - केतकी अभिजीत वझे, मर्देस (नामआळी)

कतॅ कुन बघिला नाय त्याआ गुनगान गाता
पन सगळ्यात वरसा हाय हाउ ओ सा नाता

नवीन लगीन जाल्योर जकला तीस हिकवितॅ
लोकां समोर आपला ऊणा लिक्वितॅ

पोराइ काळजी तिस जास्ती करतॅ
आन दारोर कई आला गा रूपय काडॉन देतॅ

रागातापला आपल्याला उल्टा पन बोलातॅ
पन मॅरसा कुन बोइला तॅ तिलास जास्ती लागातॅ

एरवी स्वतःइ सॅवा करवॉन घॅतॅ
आपुन शिक पडले गा ताट हातात हाडॉन देतॅ

कड़े गेले गा जीवाला धास्ती नाहातॅ
जास्ती नाय पन ये तों दार तॅ उघड़ा आहातॅ

कई सुक्ला तॅ मायार सॉ उद्यार तॅ आहातॅस
पन मनामिनॅ तिआ आपला कतॅ वाईट नाहतॅस

जीला हाउ नाय तिला ई कळातॅ
कामोरनॅ आल्या आल्या सुलीपुडॅ घुश्या लागातॅ

ती जा कई करतॅ ता आपल्यास करता
मॅरशे - दारशे फक्त मजा बघ्या पुरता

प्रत्येक टाइमाला ती नुस्तीस कई बॉलॅ नाय
कारन एका हातानॅ टाळी कई वाजे नाय

बोलात्यात हाउ नाय होए बय कतॅ
मग तुम्हीस पोरी बनॉन दावड़ा आतॅ

## फुयो - संगीता वाझ, गोन्सालोनगर, निर्मळ

आमशा घरसॉ जकल्यात बॉठ्ठॉ आन् लाडकॉ जावाय मिनजँ आमसॉ फुयो. लानपनापासून मँ बगित आले, आमश्या ऑड्या बोठ्या कुटुंबात फुयाऑडॉ मान कतॅस कुनाला मिळालॉ नाय. फुयो आन् बाय याशे उक्ते, हात हालवित पन जाताना भरलेपुरले जाशे. पन कॉडाही कॅंला तरी आमसॉ फुयो सदानकदा फुगलेलॉस. वय ऑथ सालला तरी या जावायला मान खुटलॅलॉस. वाटूस बगित अह्यासॉ, हारोडशँ माहने सुकात्यात कतॅ आन् मांआ आथा हापडात्यात कतॅ...

दोन वहराआदीशी दादाआ लगनाई बाब, लगीन ठरल्या दिहास माहने घ्यापासून तॅ सवदीओपत हरएक गोष्ट फुयाला विसरॉन केली. जकल्यास बाबतीत पयला मत फुयासा घॅंठला. ऑडास नाय तॅ बनॅसकुन कय हॉईना पन हनीमुनला कडँ जाव ईपन दादानॅ तॅला विसारला. पन नॅमकॉ आयेज जाश्या टायमात गडबडीमिनँ फुयाला  बाहाले, जाला.... नेहमीप्रमाणे फुयाला बार मारलॉ. मंग का हांग्या पाय..... लगीन रॅंला बाजूला जकले लागले फुयाशा मांगॅ. बाबापुता करॉन एकदासॉ फुयो जाग्योर हाडलॉ.

आतँ मांआ लग्नाई तारीक जवळ आलँ आन् फुयाशा विसारान् जकल्या पॉटात फाळ पड्या सुरूवात जाले. जॉहोजॉहो लगनाव दि जवळ येत साल्लॉ तह्योतह्यो फुयाशा घरश्यॉ फेऱ्यॉ वाडात साल्ल्यॉ. सुकॉन एखाद गोष्ट फुयाला हांग्याशी रेली आन् ती जर बारोबारनॅ कळली तँ मंग का घ्या... मांआ अगोदरूस घरशा जकल्या लगीन लागला म्हणुन समजॅसा. लगनाई खरेदी, हॉनानाना, साड्यॉ, जकला

पयला फुयाला दावडॉन जाला. वारन्याई लिस्टपन त्या नंदऱ्याखालनॅ घायली. पप्पानॅ सोताला नाय हिवलॉ ऑडॉ भारी सफारीसूट फुयादो हिविलॉ. बायदो आन् पॉरांदोपन कपडे घेटले. तरी फुयाशी पिरपिर सुरूस. ऑडाबॉड्ठा लगीन कऱ्या लाविलॅं पान् घरश्या लेकीदो एक हॉन्याव डाग कय तुमश्याबळॅ जालॉ नाय. शेवटी मावली पावली आन् बायीस आमश्या मद्तीला धावली. मांआ दरी उकाळीयॉ दागिनॉ हाय, माला कय पा नाय.

मांडवाव दी उजाडलॉ. पावन्याऑ राबतॉ सालू जालॉ. जकला अल्लामत सल्लॉता. पन घरश्या वाडग्या मनात धाकधुक, धास्ती एकुस. लगीन हॉयदे. ता हॉया का लागातॅ. फकस्त फुयाला हांबाळला पाय बास. हक्कुरवार भरलॉ, हिनवार भरलॉ. नाशीऊडी झाली आन् आयत्वार उजाडलॉ, लगीन लागला, जीवनेखाने जालॅं, नावळ डॅव्यासा टाईम जाला खेमॉ सुरू जाल्यो आन् खैताळॉ पडलॉ. खॅंम घ्यादो फुयो कडे हाय. शॉदाशोद सुरू झाली पन फुयासॉ कय पत्तॉ नाय. फुयो नावळीआ टायमात फुलटू पॅऑन निजलॉतॉ. गवाणीत. शेवटी फुयाशी खॅंम न घॅतास नावळ डेवरली. मंडळी फुयो हांगातॅ, "कॉपातशा जिवनोर दारूई बाटली फॉड्या मा दरी कय नाय दिली? घरसॉ मानाऑ जावाय मॅं पन् हारोडश्या लोकांई माऑ मान कय ठविलॉ नाय. यांना लाज वाटली पाय. आतॅं कत्तॅस या घराई पायरी सड्यासॉ नाय". कॉडाही करा आमसॉ फुयो सदानकदा फुगलेलॉस.....!!!

## गुल्या मिस्तेरी - क्लेमेंट डिमेलो, जवतळा

गुल्या मिस्तेरी मिंजॅ आख्ख्या गावोरनॅ ऑवाळॉन टाकिलॅलॉ. जाम हुशार, पान गांडीओर भॉवरॉ ! ॲका कानाआ फटीत शिवाजी बीडी अडकविलेली, आन बिआ कानाआ फटीत शिसपेन्शिल. कडे बॅहलॅ हायदॅ तडनॅ उठॉन निगालॉ गा दोनू आथाय कुल्योरशी टूमन पाखडीत पाखडीत निगॅसॉ. उजव्या आथाय नाकुटाऑ घॅनॉ सडव्यासॉ. आन उभी रेल्योर दोनू हात कंबऱ्योर दॅऑन उभी रॅसॉ. अहॉ ऑथॉ गुल्या मिस्तेरी. हुतार कामात जाम हुशार! भगून जकला लोक बगित यासा. कुपाऱ्यापासून बामनापरेंत जकलेस ! कामे जकल्याये घ्याशे, पान ॲका पान काम पुरा करॅसा नाय, जकल्याये कामे पासली पाडॉन ठॲशे ! गॅले दोन मयनॅ जालॅ सालमावशा नांगरा काम घेटलोता. पन ता पन ताहास पासली पाडॉन ठोविलता. पानी हाय तॉ ऑहॉ बार करतॉतॉ आन गुल्याऑ पत्तॉ नॉतॉ. पन आज सालमावनॅ कमालुस केली, हाकोबोटे गुल्या उठॅशा पुडनॅ सालमाव तॅआ घारा जाऑन ओट्योर बॅहलतॉ ! गुल्या जातॅ कडॅ. गुल्या पुडॅ आन सालमाव मांगॅ, नावळ निंगाली आपली गावातनॅ ! सालमाव पुडॅ, सालमावशा मांगॅ अंतोन, आन अंतोनशा मांगॅ गुल्या.

अंतोनशा आथाआ सामानाई पिशवी. अंतोन गुल्या मिस्तेरीला बारीक सारीक मदत करॅसॉ ! रंदॉ मारॅसॉ, फरशी पाजव्याशी, लाकूड व्यारॅदो. आतॅ पान अंतोननॅ सामानाई पिशवी घेटलोती. एक जुनी खाताई गुण. खालनॅ फाटलेली, तीआ फटीतनॅ करवत बार डॉकातोती. अंतोननॅ ती पिशवी अही हातात धरलोती जॉहॉ मॅलॅलॉ ऊंदूर बिदित टाकॅदो सालवीलॉ. शेवटी नावळ एकदाशी सालमावशा आंगळयात पोसली. घारा जॉताला नांगर टॅकवॉन ठोविलतॉ, तॉ गुल्या मिस्तेरीनॅ आडवॉ कॅलॉ, अंतोननॅ हात्याराआ पिशवितनॅ गिरमिट बार काडला, तव तडनॅ बामनाऑ कुशाबाबा आलॉ, तॉ भाटात जा लागलॉतॉ, पान गुल्या मिस्तेरीला सालमावशा आंगळयात बगॉन वळालॉ. ‘‘पॉरा, मा तॉडा खाट्याआ काम केलोसा तॅ ! मा निजॅशॅ घनॅ हाल जालॅत !" पन गुल्या मिस्तेरी खाला गॅलॉ नाय आन वर गॅलॉ नाय. शेवटी कुशाबाबा जाता जाता बोयलॉ, "सालमाव, आतॅ तुआ आथा आलॅना, काम जालॅशिवाय हॉडॉ नाका रे !’ आहा बॉलॉन कुशाबाबा तडनॅ निंगालॉ, गुल्या मिस्तेरीनॅ कानाआ फटीशी शिवाजी बिडी काडली, "सालमाव, जरा कांड्याई पेटी घॅऑन येता गा, तोडी बिडी पेटविते" पान सालमाव कांड्याई पेटी हाडॅदो गॅलॉ नाय, तॅला वाटातोता मॅ अडनॅ जायनॅ, आन गुल्या गुल हॉयदॅ भगून तॅनॅ मरशीला काड्या पेटी हाडॅ हांगिली. गुल्यानॅ बिडी पेटविली. बिडी घोट घॅटलॉ. पायरीओर बॅहलॉ, एक तंगडा लांब, आन एक तंगडा जवळ घॅऑन, तॅनॅ नाकातनॅ धॉर होडला.

"सालमाव, हांगू बरा मॅ शिवाजी बिडी कदो पेतॅ? "गुल्या, "माला का मयती?" सालमाव, "कारण शिवाजी जाम हुशार ऑथॉ, औरंगजेबाला कळालास नाय, तॉ तॅआ तावडीतनॅ कॉहॉ पळालॉ?" गुल्या इ बॉलना आयकॉन सालमाव सावध जालॉ, तॅला वाटला, गुल्या पळॅशा बॅतात दिखातॅ. अंतोननॅ काम थांबविलता, आन तॉ गुल्या मिस्तेरी का बॉलातॉतॉ, ता आयक्या लागलोतॉ ता गुल्या मिस्तेरीआ ध्यानात आला, तॅनॅ अंतोनवर रागाय बगिला."ए, अंतोन काम कर. गोश्टी का आयकाता, गांडआहळी कडसॉ." गुल्या. अंतोन जाम भाडकालॉ. "तू माला बॉलाता मिनजॅ, काम गॅला आयशा गांडीत, मॅ साललॉ. "आहा बॉलॉन अंतोननॅ आथसा काम टाकिला आन तॉ सोप्पट घारा निगालॉ. सालमाव तॅआ आथापाया पडॅ लागलॉ. गुल्या बोयलॉ", "त्या सॉरा आथापाया का पडाता. जाय तॅ जाउ दे तॉ." आन खरस अंतोन गॅलॉ. थॉडॅआ वॅळान गुल्या बोयलॉ, "सालमाव, मॅ अंतोनला घॅऑन आलॉ." आन गुल्या पन गॅलॉ. सालमावला शिवाजी आठवन आली. गुल्या निसटलॉ. पान सामानाई पिशवी सालमाव दरी ओथी. गुल्या जाऑन जाऑन जासॉ कडॅ? सालमावनॅ आख्खॉ दि गुल्याई वाट बगिली. वहरा हांगडॉ दि भरलॉ पान गुल्या कय आलॉ नाय. हांजावला, उहूर पडॅआ लागलॉ आन सालमावला दिखला, सालमावसॉ वेई ‘बिशा’ गावातनॅ सालमावशा घारा या लागलोतॉ. "वेई, आज काहा याना कॅला." सालमाव. "वेई,

तुमशा दरी एक काम काडलें, मॅ गुल्या मिस्तेरीआ घारा गॅलतॉ, नॅमकॉ हापाडलॉ मा आथा. मॅ हांगिला, 'पयलॉ सल माआ घारा' तॉ हांगातॅ, "मॅ ॲका पायोर येतॅ तुमशा घारा, पन माये हात्त्यारे तुमशा वेई घारा अडकालॅत तोडे घॅऑन या ! "तॉडॅआ करता मॅ तुमशा दरी आलॅ." सालमाव का बॉलॅसॉ तॉ उठलॉ, आतमिनॅ गॅलॉ, सामानाई पिशवी हाडली आन बिशा वेई पा दिली. बिशा वेई ती सामानाई पिशवी घॅऑन निंगालॉ. सालमाव तॅआ मांगी डॉकावॅ लागलॉ. सामाना फाटक्या पिशवीतनॅ करवत डॉकातोती. ता बगॉन सालमावला घडकाभर वाटला, जॉहॉ गुल्यास तॅओर बगॉन 'आहात्या......'

## "आय.. फोनवाळी आय" - बर्नड लोपीस, आगाय

पॉरा आथा मोबाईल बगॉन शिजूऑ काईम संताप हॉयासॉ. "आलॉ गॅलॉ गा मोबाईलमिनॅ डोळॅ घालॉन बॅहाता, ऑडा अब्यास केलॉसा तॅ कडशा कडे गॅलॉसॉ."

"आयकात्या...! याला कय हांगा ना." कारबाऱ्याला हाक मारीत ती ओट्योर आली. बगीतेतॅ तॉ पान मोबाईलवर गानॅ बगीत बॅहलॅलॉ. 'आतॅ ऑ कय शिनिमातशॅ गानॅ बगीत बॅहासॉ वखत गा? या मोबाईलसा सॉकाट होओ ना'.... मनातशा मनात बॉलात बॉलात ती सुलिपुडॅ आली तॅ ऑबाय नॅ पन कानात गुमटॅ घायल्यात भाजीला घाटान मारता मारता हळूहळू गानॅ बॉलातॅ. शिजू ऊब्बी पेटली. आंगाऑ भॉमडॉ जालॉ. तहीस भॉट्या पॉराआ खोलीपा गेली. आयतवार हाय.... रजॅऑ दिही. आराम करतॅ हायदॅ भगून हळूस दार लोटीला... तॅ सातीवर मोबाईल आन कानात गुमटॅ... त्यानॅ विसारला, "ममी का जाला ?" शिजू नॅ हळूस मांगुलवाट घेटली.
घर खाऑन पॅऑन सुखी ऑथा. एक हॉकरॉ वराडलोतॉ. एक कॉलेज मीनॅ. घारा ठावभांडा होडला तॅ कथान पागून धव्या, बारझाड कऱ्या माहनू. शिजू पन कय जुन्या वळनाई नोती. पन मोबाईल बगॉन तीऑ संताप हॉॲसॉ... टाईम मात्र ती मोबाईल मिनॅ बग्याशी. कर्तॅ तरी पोरे फोन लाऑन द्याशे ती मोबाईलवर दुबयला भाहाशा हरी बॉल्याशी. पोरे मोबाईलवर आख्खो दी का करत्यात ता तीआ गाई नॉता. कडॅ कुना कय जाला गा पोरे नाय तॅ नवरॉ पटकन खबार हांग्याशे. ता तिला बरा वाट्यासा. मायारशा लोकांये फोटो ग्रुपवर आलॅ गा ऑबाय तिला दावड्याशी. त्यामीनॅ ती रंगॉन जाशी. पान मोबाईलशा पायान आपला घर बिघडात साल्ला आहा तिला मनात वाट्यासा. घरातसॉ तेस टायमोर हॉवॅ नाय. पोरे रातशे लेटपत मोबाईलवर बगीत बॅहातॅआत त्याई तिला धास्ती वाट्याशी. शा हरी त्यांना मोबाईल लाग्यासॉ. दातात ब्रश आन् आथा मोबाईल.... कुन कुनाहरी बॉलॅ नाय. जॉ तॉ गुतलॅलॉ. शिजू एकली पड्याशी.
शिजूऑ वाडदी ऑथॉ... पंचावनवॉ. टेबलोर केक त्योर पन्नास आन् पाससॉ आकडॉ लिवीलॅलॉ. पॉराई मम्मीपपाला सोप्योर बेहवीला. मोबाईलवर म्युझिक लाविला. ऑबाय नि पॉर बाजूला ऊबी रेले. बारक्यानॅ ऑबडॅ फोटो काडलॅ. पटकन दुबयला मामूला धाडलॅ. व्हिडीओ कॉल लाऑन मामारा जकल्या हरी बॉल्या लाविला. केक कापिलॉ आन् ऑबायनॅ शिजू आथा बर्थडे सा गिफ्ट दिला.... शिजूनॅ वरसा रंगीत कागात काडला. आतमिनॅ एक नवीन चकचकीत मोबाईल.... ती गोंदाळली. ऑबाय बोयली "ऑ तुमादो. घाबरॉ नाका. मॅ जकला तुमाला हिकविनॅ." शिजूआ जीवात जीव आलॉ.
ऑबायनॅ जकला समजाईला. शिजूला ऑपरेटींग हाद्या लागला. बेनीये, भाआर्शॅ फोन या-जा लागलॅ. ग्रुपवर पावन्यायो खबरो समज्या लागल्यो. यु ट्यूब वर गमतीदार कार्यक्रम दिखातॉतॅ. टी.वी. बगना बंद कॅल्ता. जॅन्ना जा पाय ता ते मोबाईलवर बगीतोते. पोरे नि ऑबाय नेमके कडे हात ता सुलीपुडॅ बॅहल्या बॅहल्या कळातोता. तिला पाय ती सिरीयल पाय तिगाळा मोबाईलवर बगीता या लागली. ती हळूहळू मोबाईलमिनॅ गुतली. घरातसा एकलापन गायब जाला..... हांश्यापरा सात जालॅ गा ती मोबाईलवर आवे मारिया, देऊळशॅ गानॅ लाव्याशी.... कर्तॅ रोमसा मिस तॅ कर्तॅ लुर्डस सॉ तेस.....!!!!

## आपलॉ पयलॅनसॉ काळ – कॅरॉल डिकोस्टा, गास

तॉ काळ कय वायलॉस ऑथॉ. नाय गा. हाकोटे उठॅशे. वगळ शा पॅशे आन मंग कुदळ पावडॉ घॅऑन निंगॅशे भाटात. राटाला बैल झुपिलॅ गा मंग आपले भाटशे कामे करॅशे. आतॅशा घतीन तिगाळा घड्याळे नोते. दॉपारा साडे बाराला देवळाव घाट जालॉ गा निंगॅशे घारा. दॉपारा जिवान जाला गा ओट्योरशा खाटयात, बल्काव मिनॅ घटकाभर पडॅशे. दोन वाजलॅ गा माकून भाटात जाशे आन भाटात कामे करॉन आयमेरी जाली गा घारा यादो निंगॅशे.

पयलॅन बाबा रॉज मुंबय जासॉ आन घारा येताना पॉरांना खाना हाडॅसॉ. तिगाळा ऑडा बरा वाटॅसा ना. तिगाळा लोकसंख्या कमी ओथी आन तॅतॅन महागाई पन कमी ओथी. तिगाळा गाडीआ डबॅत कुन नहॅसा भगून गाडीत जादो घाबरॉ वाटॅसॉ. आतॅ नॅमका तॅआ उलटा जालॅ. घराआ कामाकरता जा शिमीट लागॅसा ता अकरा रुपय. शार आन्याव शा प्यादो बटर मिळॅशॅ. हन तन अहलॉ गा बाय घारा

याशी आन ती आली गा घारा गॉड-धॉड करॅशे. पयलॅन हरएक घारा बैल ऑथॅ आन भाटात राट. तिगाळा पांगॉ खादो जी मजा याशी ना जही आतॅशा पॉरांना पिझ्झा खादो येतॅ. घरशी परिस्थिति तिगाळा गरीब ओथी, पैशॅ नॉतॅ पन सुख ऑथा. आजार नॉतॅ. आतॅ पैशॅ आथ पन सुख नाय. बॅतामशॅ आजार आथ. पयलॅन सॉ काळ हॉन्याहारकॉ ऑथॉ.

## ख्रिसमस स्टार (तारॉ) – इनास तुसकान, गाहा

काल पॉर हांगातॅ, डॅडी आपल्याला ख्रिसमस स्टार लावॅसॉ.....? मॅ बोयलॉ, आपल्या पोट-माळ्योर हाय तॉ कार्डॉन लाऑ (गॅल्यावहराऑ). ऑ सटकन हांगातॅ, 'तॉ का गॅल्यावहराऑ जूनॉ लाव्यासाँ नवॉ आढॉ.' तॅला मॅरॅ घॅत्ला. पाठीयोरनॅ प्रेमाय आथ फीरवीलॉ, आन हांगीला बाबू, तुमाला परमेशरा क्रुपॅनॅ सुबत्ता आले. जा मांगात्या ता सटकन मीळातँ. आन कई गोष्टी तँ न मांगतास मीळात्यात. पन याऑ अतीरेक पन जालॉ पा नाय. तूला आमसॉ अनुबव हांगातॅ....

ताराँ आमी घरशा-घरास बनव्याशे. पयला ८/१०दी अगोदर भाटातनँ लोऱ्या काकाआ टेपरीतश्या बांबूआ बनातशे २/३ पीकलॅलॅ तयार बांबू (सॉरॅनुस, पन ई तॅला नाय हांगीला तुमाला हांगातॅ) आढ्याशँ. तँ साप करॅदो डायरेक आंबोड-बाईयोर... नाय तँ निखडान जॅ तडेस पडला तॅ आन लोऱ्या काकाआ गायी पडला गा मंग आमशी घोडी तडेस हमदावली भगुन समजॅसा. आन मंग काकाआ तोंडशो त्यो कुल्यो-ऊष्ट्यो गाळी कून आयकॅदॅ. बांबूये पात तॅआ मापाए सादारन दोन-अडीस फूटाए कूडकॅ कराँन तँ मीन्नँ फाड्याशँ. मंग त्या कूडक्याए शार तीकोन, हूतळीअॅ जक्कॉन बांदॉन करॉन घ्याशॅ. दोन तीकोन एकमेकोर ठऑन स्टारशा आकारात परत बांदॉन घ्याशँ. परत माकून, ते दोनी स्टार शेड्या-शेड्योर एकमेकाला पेरेलल बांदॉन घ्याशँ. बांबूए मंग अरद्या वॅथाऑडलँ ६ तूकडँ घॅवाँन दोनी स्टारशा मीनॅ स्पेसर टाईप अडकवॅशॅ. आतॅ शेवटसा काम मींजँ त्याला कागात लाव्यासा. पन, ता पन खीशा वजनोर.... कारन आडीपोत सगळा मटेरीयल (बांबु,हूतळ), टूल्स, (कोयती, वेळो, मोरली.) जकला फ्री आन ईझीली अव्हेलेबल हॉअॅसा. कागाद लावॅआ करतान खीसॉ अळखाँ हाय दे, तॅ सादा कागात.. नाय तॅ खीसॉ थॉडॉ वजनी हाय दँ तॅ मंग चमकी कागात (जीलेटीन पेपर) हॉपाऱ्यात काशी-वाळ्या दूकानातसा आढ्यासा. आतॅ कागात डकवॅदो गम पन पेशल अहॅसॉ.

अरे नाताळश्या हनादो फूगॅ करॅदो मैदॉ आपवीलॅ तॅतसॉस नाखॉडॉ घॅऑन तॅत पानी टाकॉन पेस्ट बनव्याशी. स्टारला कागात लाऑन जालागा मंग वरनॅ दोन कॉपरँ हॉडाँन बाकी शार कॉपऱ्याला गोंडँ लावॅशॅ. ताराँ तयार जालॉ.

पाँर हांगातॅ... 'मंग आतॅ तॅआ मीनँ बल होडलाँ गा जाला.' मे हांगीला, 'बाबू, ऑडा सॉपा नवता आमशा वेळेला.'

घरात लाईट आली नोती आपल्या. गरीबीमुळॅ आयपत नोती. मॅरॅदॅरॅ घरात ओथी. पन तूई दादी ओडी स्वाभीमानी ओथी, का कुनाई लाशेरी घॅऑन देत नोती. हांगातोती ऊदार-ऊहना मांगॉन मटनाअॅ जीवीन्यापेक्षा घरसा पॅज-धान कतॅ पन बरास. पन बेटा नुसतीस स्वाभीमानी नोती, तर हूशार पन ओथी. स्टार बनव्यादो हांशापरा सयपाक करता करता मदत करॅशीस पन तॅला लायटीई सोय शी पन तीनॅस आयडीया द्याशी. एकदम सींपल मेकॅनिझम ऑथा तीआ. पन बेटा भारीस. स्टारमीनँ आमी बारकॉ दीऑ (केराँसीन-लँप)

हां.... डॅडा..... तॉ कोळनी दरी अहातॅ तॉ आ... पूतानॅ पन तॅआ नॉलेज शेअर कॅला.

मॅ हांगीला तॉहॅस पन तॅला टँबो बोलातॅत आन आपून वापरतोते तॅला दीऑ बोलातॅत, तॉ दीऑ फीट अव्ह्या करतान एक (सेडल) जागा करॅशे स्टार मीनँ. अॅका लांब्या बांबू टॉकाला तारीअॅ एक गाडकूली अडकवॅशी. तीतनॅ हूबडी काडॉन पूडश्या शॅड्याला स्टार बांद्यासॉ. आतॅ दारपूडनॅ मेडी मॅरसा एक कऊल बाजुला करॉन त्यातनॅ तॉ बांबु बूडा बाजुनॅ बांद्यासॉ. आन अनवी (नीमूळती) बाजू वरती काडॅशी जेने कराँन आंगळ्यातनॅ ऊबी रँवॉन रॉज मेंटेन करता आला पाय.

रॉज हांशापरा तॉ स्टार खाला (गाडकुलीवरनॅ स्लाईड करीत) काडताना तेल टाकॉन दीऑ लाऑन परत वरती घॅताना जॉ आनंद आन अबीमान वाटॅसॉ ना की अॅखांद नेतॅआला झेंडॉ फडकवताना पन वाटात नॉतॉ..

## दारू आन कुपारी – बॅप्टिस्ट वाझ, दारशेंग.

आजकाल आपल्या कुपऱ्यांत लग्नामीनॅ दारू भोटया परमानात वाड्ली जातॅ. शाकाहारी-मावसारी जोडीला दारूआ 'काउंटर' लविला जातॅ आन काउंटरवर वडीलधाऱ्या हरबर लानॅ तरनॅताठे पोरे पन आहात्यात. लग्नात दारू वाड्याशी गा? ऑ एक वादाऑ मुददॉ हाय पन खुब दारू डोशील्यामुळॅ बरॅस गमतीअॅ आन तॉडॅस लाजेय परसंग बगॅआ मिळत्यात.

अहयास एका लग्नात मॅ मित्राहरबर जिव्या बॅहॅलतॉ ऑड्यात खूप दारू पिलॅलॉ एक वडील माहनू मा बाजुशा खुरशीत जिव्या बॅहॅलॉ. तॅनॅ जीवनाई बशी तॅआ मांडीओर ठोईलती. कॉहॉबॉहॉ एक मॉडकॉ तॅनॅ तॅआ बशीत्नॅ घॅत्लॉ, दुहरॉ मॉडकॉ घ्यादो तॅनॅ मा बशीत आथ घायलॉ. दारूआ नशेत अहल्यानॅ त्यानॅ कुना बशीत आथ घायलॅ तॅआ गाइ नोता. मग मॅ माइ बशी तॅआ पुडॅ धरली. त्यानॅ ती

खपविली तही मॅ तॅआ मांडीओरशी तॅइस बशी तॅआ आथा दिली तहॉ तॉ ती बशी घेऑन खरकटे टाकीतॅत तडे गॅलॉ आन बशी तडे ठोयली आन सॉताऑ तोल हांबळात डॉलात डॉलात मांडवात्नॅ निगॉन गॅलॉ. तॅआ मांगे लोक तॅला आहातॉते.

हल्ली बाळतीम, लग्नाऑ वाड दी, नव्या घराआ उद्घाटन, कोमसार जकल्यालास दारू वाडली जातॅ. दारू वाडना इ आतॅ मानाआ जालॅ. दारू न पॅनाऱ्याला शिडविला जातॅ, दारू प्यादो उकसविला जातॅ. ॲका ठिकाणी मॅ मा कुटुंबाहरी जिव्या बॅहॅलतॉ ऑड्यात कुनतरी धपदिशी पडल्याऑ आवाज आलॉ. एक सादारन तीस वहरा वयासॉ पॉर दारू जास्ती सडल्यानॅ खुरशीओर बॅहॅताना तोल जाऑन पडलॉ. तॅआ जोडीदाराई तॅला टुकीला आन खुरशीओर भेवीला पन तॅआ बळे कय भॅवात नॉता. थॉड्या लांबनॅ त्याई बायकू आन 3-4 वहरा पॉर ऑ खेळ बगीतोते. त्या दोगाए तोंडे उतारलोते. बायकूआ तोंडोर लाज आन काळजी या जोडीला नवऱ्याबद्दल तिरस्कार माला साफ दिखलॉ. परमानाबार दारू पॅऑन आपु शिकपनाला (ब्लड प्रेशर, डायबेटीस, छातीत जळजळ) आवतान दिलॅ. दारू पॅऑन आपु आपल्या तब्येतीइ वाट तॅ लावित्याउस पन दुहऱ्यांना पन तरास देत्याव इ आपल्या ध्यानात ये नाय.

रिटायर हॉनारे माहनेपन मित्रांना, सग्या-सोयऱ्यांना जिवानबिवान दॅऑन रिटायर जाल्याव आनंद साजरॉ करत्यात. अहयास एका सॉहळॅला मॅ गॅलतॉ. तॅआ ऑफिससा लोक आलता. ते पन 'काउंटर' वर पेग वर पेग मारतॉतॅ. तॅत एक नवशिक्यो पान्यागत गटागत दारू पेतॉतॉ. मंग ते जकले जिव्या बेहेले. त्या नवशिकयानॅ जेमतॅम दोन-शार मॉडकॅ गिळलॅ आन दुहऱ्या मिनटाला बाजुशा मित्राआ आंगोर गाबोळी टाकीली. इ बगॉन तॅआ जोडीये न जीवतास उठलॅ. तॅआ बऱ्या प्रोग्रामशी त्या नवशिकयानॅ बरी वाट लाविली.

मंग प्रश्न पडातॅ गा आनंदा परसंगाला दारू वाडना योग्य हाय गा? या प्रश्ना उत्तर वॅगवॅगळा होऊ शकातॅ. वीस वहराआदी वसयशा ॲका फादरनॅ सॉताआ फादर जाल्याला २५ वहरे जाले भगून मुंबयला एक सॉहळॉ कॅलतॉ. तॅला वसयशी बरीस मंडळी ओथी. तॅआ वेळशे आर्चबिशप, इतर धर्मप्रांताऑ बिशप आन ओबडे फादर-शिशटर आहा बरास लोक ऑथा. शाळीशा बॉठ्या हॉलमिनॅ तॉ सॉहळॉ ऑथॉ. स्टेजवर आर्चबिशपनॅ फादरसॉ सत्कार कॅलॉ. हॉलमीनॅस जिवॅशी सोय ओथी. स्टेजशा मांगॅस पडदयाआड शा-पान्याई सोय केल्ती. हॉल तीन शार तासापुरतास मिळालतॉ आन जमलॅल्या लोकांना ता आदीस हांगील्यामुळॅ एखाद दोन पॅग मारॉन पावने मंडळी जिव्या बॅहॅशे. सब्बान सॉहळॉ गोंदळ न ऑथा शांतपनॅ पार पडलॉ.

शेवटी आइसक्रीम खाताना मा बाजूला उबी अहलॅल्या वसयशा ॲका फादरनॅ माला हांगीला, 'आपल्याअडे आपू अडशापेक्षा बरा जिवान आन बॅताम दारू ठवीतॅव पन ऑहॉ शीस्तीत सॉहळॉ आपल्याअडे हॉअॅ नाय. तॅआ कारण का..? त्योर मॅ कय बोयलॉ नाय... का उत्तर द्यासा ऑस माला प्रश्न पडलॉतॉ...

---

## ऑहॉ पन इंटरव्यु – पेट्रेशिया पिटर गोन्साल्वीस, मराडी-बोरीवली

"मम्मी, माव आतॅ ऑनलाइन इंटरव्यु हाय. आतॅ तू माआ खोलीत ॲओ नाका तासभर तरी. नुसती डॉकाऑ पन नाका." लॅपटॉप आथात आन घरशा टुमानीओर आंगात सदरा घायलॅलॉ साहिल बॉलातोतॉ. 'सल्दॅ रॅ, मॅ तोपत हॉलमीनॅ बॅहातॅ हा.' आहा बॉलॉन रॉज्यान हॉलमिनॅ सॉप्योर बेहेली. ऑड्यात खिडकीतनॅ दापुडशी मनकीनबाय हिरवॉ गरगरीत तयार बनकेळऑ फनॉ आथात घॅऑन येताना दिखली. मनकीन बायसॉ आवाज मिंजॅ गिरणीऑ बॉगॉ.

"आला रॉज्यान, तिगाळापासून मॅ तुआ ओट्योरनॅ तुला आड्डातॅ, तु आवाज द्या ना ती, कला बगळया गतीन एकशिती जाल्या ती? का जाला?" "आला, कय नाय लो, मा साहिल ना खोलीत लॅपटॉपवर ऑनलाइन इंटरव्यु द्या लागलॅला आन मॅ अडे बेहेले नुसती." 'ऑडास ना! मंग तु अही विसारात पडल्या ता बगॉन मॅ घाबरली का जालॅ हायदे? साहिलला कडसॉ पोरीऑ निरोपफीरोप आलॅ आन तुतॅ तिला नाय हांगॅ गा का?' 'नाय लो, तुला बारा मयनॅ तॅरा काळ पोरीपुडॅ बी कय सुशॅ नाय ता. मनकीनबाय, मॅ रिटायर हॉऑन तीन वहरे जाले ला. माला ना आतॅ माव इंटरव्यु जालतॉ ना, तॉ आठवालॉ गा, जॉहॉ मॅ कालूस गेलती आहा माला वाट्या लागला.'

'आहा जालॅ आ... मॅ पन रिटायर हॉऑन आतॅ वहरी हॉयदॅ. कालसा कय आठवॅ नाय. आपुन जकले येदे सागरगना ! तॅ ३०-३२ वहराआदी इंटरव्यु दिलती ती कडे का आठव्यासा ला रॉज्यान.' 'नाय लो, मा इंटरव्यु जाम भारीस जालती गनाय.' 'का जालता? हांग तरी!' मनकीनबायनॅ आथसॉ कॅळयाऑ फनॉ टीपॉयवर ठविलॉ आन सॉप्यात तिआ मॅरॅ आंगाला खॅटॉन बेहेली.

'का जालता बॉल' रॉज्यानबायनॅ आपल्या गिरनीऑ पट्टॉ सुरू कॅलॉ. 'आला, ३०-३२ वहराआदी इंटरव्यु हांगीला तॅ आपून कोडे घाबरॅशे ला. आमे पडल्यो शिक्षिका, कुहन्या विषयात का विसारत्यात त्याव पत्तॉ नाय. मॅ देवळा शाळीत स मयन्याआ लिव्ह वेकेन्सीवर लाग्लोती. अहीस एकदा शाळीतनॅ घारा येतॅ, ओट्योर पाय टाकी नाय तव माई दादय का हांगातॅ, 'रॉज्यान, तुला कयतरी पत्र आलॅ. पोस्ट्मन आलतॉ दॉपारा ना. तॅनॅ मापा ता पाकीट दिला.' माला कोडी उतेळी. हिजॅशा पुड्नॅ खाशी घाई ना. मॅ ता ओट्योरूस फॉडेसा आ. आन बगीतॅ तॅ आतमिनॅ मुनशीपाल्टी पत्र. माला कॉल आलतॉ. मॅ वाशीत वाशीत आतमिनॅ गेली. तारीक बगिली तॅ २६

डिसेंबर. माला इंटरव्युला वीटीला त्या ऑफिसला सवथ्या माळयोर बोलविलता. मॅ जाम खुश जाली. दादयला हांगीला. बाबा मुंबयसॉ यासॉ ऑथॉ. बारोबार बेंनीला हांगीला. दादयला बॅताम उतेळी. तिनॅ आमसॉ भरलॅलॉ पान्याव हांडॉ बादलीत ओतीलॉ आन सुंबळ घॅऑन गावशा बाइओर पानी हाडयादो गेली. ता बी जाता जाता जकल्याना हांगात, ‘मा पोरीला म्युन्शीपाल्टी शाळीऑ कॉल आलॅ.

इंटरव्यूला जासा मिंजॅ साडी नॅहॉन जा पाय. माई दादय लुगडा नॅहॅशी. मा दरी साडयो ओथ्यो पन त्यो ओड्यो कय बऱ्यो नोत्यो. मंग मा काकभाहाशा नवरीदरशी साडी घेतली. तीआ ब्लाऊज माला थॅांडा भॅाटा येतोता ला. तॅला थोडी आथशिलय मारॅान खर कॅला. सल एकदाशी साडी तयारी केली गा. मंग सर्टिफिकेटशी फाइल. वसयला धुरीआ दुकानात झॅरॉक्स काडॉन मिळत्योत्यो तड्ने झॅरॉक्स काडॉन हाड्ल्यो आन सर्टिफिकेटशी फाइल तयार केली. आमशा दापुड्सॉ फिलपा मास्तर मुनशीपालटी शाळीत मास्तर ऑथॉ ना तॉ हांगातॅ, ’मॅ तुआ हरी येने पोरे.’

२६ डिसेंबर नाताळसॉ हन जालतॉ बास. फिलीप मास्तर, माऑ भाहा आन मॅ वी टीला पोसले. आमे जरा लवकरूस मिंजॅ दा लास पोसलोते. सवथ्या माळयोर आमाला जा हांगीला. तडॅ का बगॅसा. नुसती जत्रा फुलयलती. शंबरएक मास्तरीन बायो आलत्यो. बारा वासता जकल्याना ॲका हॉलमिनॅ बेव्हडला गा आन हांगीला, ‘आदी तुमशी लेखी परीक्षा हॉयदॅ तॅत पास जाले तॅ इंटरव्यूला यासा. आन तॅत पास जाले तॅ मेडिकलला यासा आन तॅत पास जाले तरुस तुमाला आत बोलविदयात आन शाळा देद्यात.

दॅवा, मनात विसार कॅलॉ, माई दादय कोडी हळावले, पन तीन टप्पॅ पार हॉयद्यात तिगाळा कडे माला नोकरी मिळे. आमाला पेपर दिलॅ त्योर उत्तरे लिव्याशे ओथे. ‘पयलो प्रश्न – तुमाला शिक्षक का व्हावेसे वाटले?’ (मा मनात आलता लिवो गा का? शिक्षिका जाली की चांगली नोकरी मिळते अन चांगला नवरा पन मिळतो) पन खोटा खोटा उत्तर लिवीला. “लहानपणापासून ठरवले होते” आहा कयतरी लिवीला. पन्नास मार्काओ पेपर जालो.

त्यानंतर तॅई हांगीला गा, तासाभरात तुम्शे नावे बोर्डवर लाविदॅत. जॅआ नाव हायदॅ तॅईस ३ जानेवारीला इंटरव्युला यासा. तवपोत एक-दीड वाजलॉ. मा नाव लिस्ट मिनॅ आला. मा जीवात जीव आलॉ. बरा वाटला. मावली पावली. मंग आमे घारा आले. आतॅ मुलाखतीला का का विसारद्यात याई कय कल्पना नोती. जनरल नॉलेजशा पुस्तकात्नॅ भारतातश्यो नदयो, डोंगर, पर्वत, सरोवर, पठार, इतपासून तॅ पंतप्रधान - गावसॉ सरपंच कून या जकल्याये नावे पाठ केले. गणितातसा कय विसारद्यात भगून पयल्यांदा कतॅस पाठ न जालॅलॅ १९ तॅ २९ शॅ पाडॅ पाठ कॅलॅ.”

मा इ जकला कथापुरान आयकॅान मनकीनबायनॅ मिनॅस एक टाप मारलॉ. ‘बायलो, मरो हा तुमशी ती टीचरशी नोकरी.’

कून हांगातॅ तुमे जॅआ गाडीत्नॅ आले तॅआ गाडीऑ नंबरतन विसारत्यात. भाहानॅ हांगीला ‘७०२ नंबर लक्षात ठव.’ अही जकली तयारी करता करता एकदासॉ ३ जानेवारीऑ दी उजाडलॉ. मॅ, माव भाहा आन जोडीला फिलपा मास्तरू आलॉ. अकरा वासता बोलविलता. आमे दहा वासता पोसले. तडे जात्याव तॅ कून का वाशीते, कून का वाशीतॅ. दॅवा ! मॅ सायन्ससा कय भगून वाशीला-बगीला नॉता. आहा जकला करता बगीता एकदासॉ ११.५५ ला माव नंबर आलॉ. मॅ आथा सर्टिफिकेटशी पिशवी घेट्लि आन आतमिनॅ गेली. माला वाट्लोता मुलाखत घ्यादो एकजन कून हायदॅ. बाये, तडे स जने बेहेलोते. तॅत दोन बायो ओथ्यो. ऑब्डा लोक बगॅान मा पॅाटात फाळ पडलॉ आन तॉंड पांढराफक्कड जाला. जाता खोटी ॲका बाईनॅ मा नाव विसारला. मॅ हांगीला ‘रोजा गोन्साल्वीस’ तीनॅ पुडॅ विसारला ‘ज’ की ‘झ’. मॅ घाबरीघुबरी जालती, मॅ तॅतुस बोयली ‘झ’. ती नुसती हावली. दॅवा ! आतॅ याई बाराखडी विसरे हायदे आ? तॉड्यात बी एकानॅ प्रश्न विसारलॉ, ’तुमचा नाताळचा सण झाला ना? केक केला होता का?’ दॅवा ! केक शित्रात बगील्तॉ करॅसॉ कूनॅ.. पन मॅ हांगीला, ‘हो, केला होता”

इ आयकॅान कॉपरॅतशा बाईनॅ विसारला, ’तुमच्याकडे तिखड जेवण असतं ना?’ ये नोन्वेजला तिखाट जिवान बॅालत्यात ता बी मा का गायी, पन मॅ ‘हो’ बोयली. मंग तिनॅस पुडॅ विसारला, ’तुम्ही ते इन्द्येल कसं बनवतात ? जरा सांगा बघू आम्हाला?’ वायलो ! माई शिक्षिकेइ मुलाखत हाय गा कुक शी? पन जाहा सुसला ता मॅ विनेगर न बोलता ‘विलंगरी’ तन बॅालॅान इन्दॅल काहा करत्यात ता हांगीला. माला विलंगरी घतीन घाम आलॉ. मॅ घामाघूम जाली. पन त्याई हांगीला, ‘छान ! तुमचं इन्द्येल छान झाले हो. या तुम्ही.’

मॅ बायार आली. तव माव भाहा आन फिलपा मास्तर दोगे मा पुडॅ धावात आलॅ. ‘पोरे! कही जाली मुलाखत? का विसारला? मॅ मंग जकला हांगीला. ता आयकॅान फिलपा मास्तर असनी बोष्ठी जीब काडॉन बोयलॉ, ’अभ्यासा कय विसारला नाय’ मॅ हांगीला. ’नाय’. आमशे तोंडे साफ नाहाल्ते. बाहा हांगातॅ ‘तॅना घ्यासा नहला गा ते कयपन टाइमपास करत्यात.’

आमे तहेस घारा निंगाले. आतॅ कडशी नोकरी... आतॅ कडसा का? तीन मयनॅ दॅवळाशा शाळीत जालॅ गा मंग बगॉ कडेतरी... घारा आले. दादय, बाबा, बेनी जकलेस ता आयकॅान रंजी जाले. दादय हांगॅआ लागली,’ जाऊंदे, मावली हाय. अडे नाय तॅ बी कडेतरी हॉय दॅ. नाय मावरा तॅ लोद मावरा...’ बाबा बोयलॉ, ’मुन्शीपालटी नोकरी मिळालोशी तॅ लग्ना खरसाई कइस धास्ती नोती गा. हारापन बरा मिळालॉसा. पन आपला नशीब नाय...’

या गोष्टीला मयनॉ जालॉ. ऑहॉस दॉपारसॉ पोस्ट्मन पत्र घॅऑन आलॉ. मॅ घारास ओथी. बगीतॅ तॅ माला मेडिकलला बोलविलॅ. मेडिकल जाली. ‘दॅवा! मॅ पास जाली. आन इन्दॅल पन पास जाला...’

“वा! गम्मतुस हाय ला” मनकीन बाय आहात आहात बोयली. तव पॉर बार आलॉ.

‘मॉम, मा इंटरव्यू जालॉ आन तॅई माला ओके हांगिलॅ.”

## **हैरा आन लगीन –** सचिन रॉड्रीग्ज , पहराव, नंदाखाल

**"बबन दावडलॉ आन बस्त्याव वराडलॉ"**

आमशा झॅव मामाऑ जकल्यात लानॉ पॉर बस्त्याव दिख्यादो अगदी राजबिंडॉ पन जरा मागशी गाडी ! पेद्रु, आगु, साल्या, दुमा, उशी, बबन, मेरी नंतर याऑ नंबर जकल्याये लग्ने जालते आन जकल्याइ आपलॉ सुखी सवसार थाटीलतॉ पन या मातीनॅ कडे होयरा ऑथ नॉता बघुन आमशी सांतु मामी थोडी रंजीस ओथी.

मामीनॅ सुद्धा कय कमी प्रयत्न नॉतॅ कॅलॅ. मायारा गावा पासुन लागला तॅ आगाय, गाहा, इम्ब्ळोर, भुईगाव, अर्नाळा, वसई किल्लाबंदर पासुन नाशिक पुना पन होडला नाय. जवळ-जवळ १०० पोऱ्याना ऑ दावडलॉ पन कुनालास पसन्त  पडॅ नाय. अमाप पोऱ्या टायमात जडे पॉरांना मान ऑथॉ तॅआ जमान्यात सुद्धा याला पोऱ्याई आहा नाकाराला मिंजॅ बस्त्याव कोडी मागशी गाडी हाय ता तुमशा जकल्या ध्यानात आलॅस हायदॅ! मामीआ जकल्या पॉरां बरा सललॉता पन या करता मामीऑ जीव खालावर ऑथॉतो!

मंग मामीला गावशा मिर्गेलनॅ एक युक्ती हांगीली "सांतु पुडशा वेळेला पोरी बगॅदो जाताना बस्त्यावशा जाग्योर तॅआ हारकॉ दिखनारॉ आपलॉ बबन दावड, एकदा गा होयरा जमला आन लगीन जाला मंग कुन बगी नाय!" मामीला ई युक्ती जाम आवडली लगेस मामीनॅ बबन तयार कॅलॉ आन लांब माणिकपुरसॉ निरोप आलतॉ तडॅ पोरी बग्यादो गेले!

मिर्गेलशा युक्तीनॅ चांगल्या प्रकारॅ काम कॅला आन पोरीला बबन माफ करा बस्त्याव पसंत पडलॉ! तर अह्या प्रकारॅ आमशा बस्त्यावसा अॅकदासा होयरा जाला आन स मयन्यात लग्नाई तारीक पन ठरविली. तॅआ काळात हयऱ्या नतंर लग्ना पोत पोरीई आन पॉराई भॅट कय ऑथ नोती. भगून बस्त्यावसॉ डाव उघडॉ हॉयासॉ कय प्रश्नस नॉतॉ, मंग का जकला आमशा मामीआ मनाहारका जाला. मामीनॅ बस्त्यावशा नवरीला पास तॉळॅऑ डागीनॉ घडविलॉ. तळान काडला आन खास हौशेखातीर लाडक्या बस्त्यावशा लग्नाला वरमाय हारकी सजली. वारने कऱ्यादो मात्र भोठी ओ धाडलोती. बस्त्याव आपलॉ मागशी गाडी गनाय याला वारने द्या हांगीले तॅ ऑ ताडीया पट्योरशे लोक बोलवीदॅ याऑ कय भरवसॉ हाय गा?  ठरल्याप्रमानॅ लगीन जाला लग्नात रुमाव कंपनीऑ बॅंड ऑथॉ.  रेडीओ सुद्धा लाविलतॉ. बस्त्यावशा मामानॅ तॅई हाडीसोळी केली.  मॉऑ कॅलॉ. लग्नात जिव्यादो मटन, चिकन, भाजी बेताम कॅला. हांच्यापारा लानॅआ थॉरा पासुन बायका मंडळीनॅ हजॉन-धर्जॉन बस्त्यावशा नावळीत धम्माल केली. अह्या प्रकारॅ दॅवा कृपेनॅ आन आमशा मामीया प्रार्थनेमुळॅ बस्त्यावसा लगीन अगदी जंगी जाला.  आन तॅनॅ सुद्धा आपलॉ सुखी सवसार थाटीलॉ!

## **वालाआ गॉळाइ भाजी** - हेडविजेस रुमाव

आवज्यो जाल्योर शिजुनॅ हॅताश्या जकल्या कांड्योर वाल मारॉन घॅटलॉ. कय भाजीपुरता तरी हॉयदॅ तॅ घरशेस वाल आथ गनी भगुन.. तॅत लानी जाली गा लगेस वाडगुल्या भाटात नांगर फिरविलॉ तिगाळा सोडी तुकॉन तांबोट्या निजारीयोर बिऑ वाल मारायदॅ. हिवारात आख्ख्या हॅतातुस वाल मारायदॅ, तळना लागली कांडॉरशा हिंगाला सव घनॉ.

"दादे, आलेस ऑडॉ सॉब्या लागलॉ. तु तॅला खादो का घालता?" "आला दुमे, कय बॉलॉ नाका. आतॅ शार मयनॅ मा जीवाशी आन तॅआ जिवॅशी धास्ती नाय. वाला गॉळॅइ भाजी केली गा कय रगाजळूस नाय. पन थोडी भाजी काडॉन हिक्या भरॉन ठवीतॅ. आख्खी नुस्तीस खातॅ. बेबी हांगातॅ, ‘वालाय गॉळॅ वाथुळ. तिला नुसतॉ रस, भुजली बुबलाइ काडी अहली गा बास. बाबाला वालायो हिंगो बाफॉन दे बास, गा बशी भरॉन खायदॅ. मॅ धान कशनडित लोडळविला तरी मा भागातॅ.

करदी, कालव, कासव, फ्फोफिस, खिमॉ या जकल्यामिनॅ वालाय गॉळॅ घालॉन रॉज वायली-वायली भाजी केली तॅ मस्त लागातॅस. ऑजल्या वाला गॉळॅइ रोटी, पानगॉ, डॅस्का करतॅव. वालाइ आंबटी करॅदो कवळॅ गॉळॅ उकाळत्या पान्यात बाफ्यादो टाकिलॅ. तॅत समशिभर तॅल, ऑला वाटान घालॉन, ऊळपात नायतॅ पांडॉ ऊकंदी कांदॉ, वांगा, तांबोटा थॉडासास टाकिला, हॅगटाय फुले, हॅगटाइ हिंग, घवाळॉ नातॅ गलकॉ घायलॉ तरी मस्त. थॉडासा शिशाआ आंबाट, लाल मसालॉ घालॉन करतॅ. घनीस पाताळ वाटली तॅ नाखॉडॉ सावळाव पिठ टाकॅसॉ गा सव पन मस्त लागातॅ. हिंगो मॅ होकयल्यो नाय तव काकाला बैलादो खालपाटे टुक्याशि उतळी.

# हुक्क्या बुंबलाआ जीवना – रेसिपी - अॅलेक्स मच्याडो.

"अरे ए ब्रीटो, काय जेवायबिवायचा विचार आहे की नाही? घड्याळ बघ. दिड वाजून गेलाय लेका. खड्डा पडलाय पोटात." इनूसश्या टॅबलापुर्डे ऊबॉ रॅऑन चौधरी विसारतोटॉ. इनूसनॅं समोरश्या भितीवरश्या घड्याळात बगीला. खरास दिड वाजॉन गॅलतॉ. कामा गडबाडीमिनॅं टाईम कडनॅं गॅला ता कळलास नाय. इनूसनॅं आपल्या हातात्श्या पेनोर खॉका सडवॉन तॉ बंद कॅलॉ. समोर असना भॉटा रजिस्टर उगडॉन त्या काम सललोता. त्यानॅं तॉ पेन त्या उगड्या रजिस्टरमिनॅं ठोयलॉ न ता रजिस्टर मिडकीला.

"चौधरी, तू चल कॅंटीनमध्ये. मी आलोच." चौधरी गॅलॉ. इनूसनॅं खूर्शीया मार्गे बॅग ठोयलती त्यातसॉ डबॉ काडलॉ न तॉ उठलॉ. आज हाकोटे निंगताना तॅनॅं बयला विसारलोता.. "बो, आज डब्यात का दिलॅं?" "हुक्क्या बुंबला जिवना दिलॅं पॉरा." बय बोयलती. "तुला ज्याम आवडातॅं ना. कांदॉ न बतात घालॉन जरा हुक्का हुक्कास कॅलॅं. "डबॉ घॅऑन कॅंटीनमिनॅं जाताना इनूसश्या मनात विसार सालू हॉतॅं.

इनूस त्या गावातसॉ पयलॉ, सरकारी हॉपीसात कामाला लागनारॉ. चौधरी पान त्या जोडीलास लागलोटॉ आडॅ कामाला. दॉगाई ज्याम दोस्ती जमलोती. जिव्यादो, श्या प्यादो दोगे हस्साल जाशे. इनूसला बयश्या हातसा बुंबला जिवना खूब आवड्यासा. पान तॅनॅं आजपोत डब्यात कतॅं हाडला नॉता. चौधरीला सलदॅं गा इ जिवना? तॉ खायद गा नाय कुना मईत.....

"अरे ये लवकर." चौधरीनॅं तॅला बगीला न डबॉ उगड्या लागलॉ. त्यॅला खरास ज्याम भूक लागलोती. इनूस त्या समोर बॅहलॉ न डबॉ उगड्या लागलॉ. तॅनॅं चौधरीया डब्यात बगीला. आम्लेट हाडलोता तॅनॅं. कादो कुना मईत, पान आठवड्यात दोनदा तरी त्या डब्यात आम्लेट अह्यासास. " घे, आम्लेट घे ब्रीटो. तुझ्या डब्यात काय आहे आज?" इनूसला कय सूसात नॉता. आतॅं हुक्क्या बुंबला जिवनाला का हांग्यासा? इनूसनॅं डबॉ उगडलॉ, बुंबला जिवनाव मस्त वास आलॉ. चौधरी त्या डब्यात बगीतोटॉ.

"आज सुक्या बोंबलाचं जेवण आणलंय मी." इनूसनॅं जेमतेम बोयला. चौधरीला कय कळलास नाय. तॉ गॉंदाळल्याघत इनूसश्या डब्यात बगीतोटॉ. "ड्राय फिश आहे रे. कांदा बटाटा घालून बनवलं आहे. घे ना." आहा बॉलॉन इनूसनॅं जिवन्याव डबॉ चौधरीपुर्डे सरकविलॉ. चौधरीनॅं एकदा डब्यात बगीला न जेमतेम एक समसॉ जिवना तॅनॅं घॅटला बास. तॅला आवाडला नाय बहुतेक, इनूसश्या मनात आला. हाड्यास नॉता तॅं बरा ओह्योवता. "अरे, आम्लेट घे ना." इनूसनॅं चौधरी डब्यासा जरसा आम्लेट घॅटला. चौधरीनॅं सपातीअॅ एक तुकडॉ घॅटलॉ न थॉडासा जिवना त्या सपातीया तुकड्या बरबर तॉंडात टाकीला. इनूस मुक्काळी चौधरीया तोंडोर बगीतोटॉ. चौधरीनॅं नीट सावॉन तॉंडात्सॉ घास गिळलॉ न माकून बीऑ तॉहॉस घास करॉन तॉंडात टाकीलॉ. इनूस बगीतोटॉ. "चांगलं लागतं रे." चौधरीनॅं इनूसश्या डब्यामिनसा बीआ दोन समशॅं जीवना घॅटला. इनूस आहालॉ निसतॉ. त्यॅला बरा वाटातोता.

चौधरीनॅं आतॅं आपलॉ आम्लेटसॉ डबॉ इनूसश्या पुर्डे लोटीलॉ न इनूससॉ जिवनॉव डबॉ सॉता पुर्डे घॅटलॉ. "खूप टेस्टी आहे रे ब्रीटो, तुझं हे सुक्क्या बोंबलाचं जेवण." चौधरीनॅं जिवनाव डबॉ खपविलतॉ आन आतॅं तॉ सपातीया तुकड्याअॅ डबॉ सापसूप कऱ्या लागलोटॉ. इनूस निसतॉ आहालॉ. तॅला बयशी आठवण आली. तीया हाताला सवुस तही होती.

" ब्रीटो, एक काम कर ना. मला थोडेसे सुके बोंबील आणून दे ना. मी पण सांगतो घरी बनवायला असंच. खूप आवडलं मला." " हो, आणेन ना." " आणि हो, रेसिपी पण घेऊन ये." इनूसनॅं मान हालविली. त्या दिया रात्सा जीवताना इनूसनॅं बयला इ जकला हांगीला. ती पान आह्या लागली. बरा वाटला तीला खूब. " इनूस, हाकाळ थॉर्डे बुंबूल नॅऑन दे तुवा मित्राला." जिवल्योर इनूस बयश्या मॅरॅ बॅहलॉ न जिवना काहा बनव्यासा ती लिवॉन घॅटला. बुंबला जिवनाई रेसिपी.

दुहऱ्या दिहा इनूस हॉपीसला पॉसातॅं बास ताव चौधरी त्या दरी आलॉ. " ब्रीटो, तुला काल सांगितलेलं काम केलं का? " इनूसनॅं आहात आहातूस मान हालविली. बॅग उगडॉन इनूसनॅं एक प्लास्टिकशी पिशवी काडॉन चौधरीया हातात दिली. "हे घे. इकडे ऑफीसमध्ये ऊघडू नको रे बाबा." इनूसला धास्ती वाटातोती, अॅनॅं जॅ कर्डे इ उगडला तॅं आख्ख्या हॉपीसमिनॅं वास हुट्यासॉ हुक्क्या बुंबलाव. इनूसनॅं सदऱ्या किशात हात घायलॉ न एक कागाद काडला. " ही तुझी रेसिपी." चौधरी खूष हॉतॉ. "थॅंक्यू ब्रीटो."

दुहऱ्या दिहा इनूस आन चौधरी दोगे कॅंटीनमिनॅं जिव्यादो बेहेलते. चौधरीला जरा उतळीस पडलोती डबॉ उगड्याशी. "ब्रीटो, आज स्पेश्यल आयटम आहे माझ्याकडे." आहा बॉलॉन तॅनॅं इनूस वर बगीला न डबॉ उगडलॉ. "सुक्क्या बोंबलाचं जेवण." "अरे वा. आज मजा येईल खायला." ईनूसनॅं त्या डब्यासा थॉडा जिवना घॅटला. दोगाई जिव्यादो सुरूवात केली. जिवना बरा जालता , पान इनूसला त्यात कय तरी कमी वाटातोता. " एकदम मस्त बनवलंय रे चौधरी. खरंच." तॅला बरा वाटला पाय मनून मुद्दामूस इनूस बोयलॉ. चौधरीनॅं तॉंडामिनसॉ घास गिळलॉ न इनूस वर बगीला. जरासॉ आहालॉ न तॉ बोयलॉ...

"ब्रीटो, तू मला रेसिपी दिलीस पण गुरूकिल्ली नाही दिलीस. तुझ्यासारखी चव नाही आली. काय कमी राहीलं असेल बरं रेसिपीमध्ये?" इनूसनॅं घडकीबर चौधरीवर निसता बगीला न तॉ बोयलॉ. "बयचा हात." "काय?" चौधरीला कय कळला नॉता. " माझ्या आईला मी बय म्हणतो चौधरी. बयच्या हाताची कमी राहीलीय रेसिपीमध्ये."

# "आय बेट" परिवारसॉ ५ दिहाऑ चारोळी-उत्सव

कुपारी कट्टा आन ‘आय बेट’ ॲडमीनग्रुपतर्फे आयोजित चारोळी-उत्सवाला खुब अव्वाल प्रतिसाद मिळालो, सहभागी जकल्या मंडळीये ओबडे आभार, अहोस सहभाग मिळतो रेवो...

## पयलॉ दी- हिंदाळॉ

1) अजून सुद्दा कानामिनॅ कर्तंतरी
हिंदाळयायो कड्यो कर्र कर्र वाजात्यात
आन मना तळयोर हुकात घायलेले
आठवणीये मांडुले अल्लामत भिजात्यात
**- ॲलेक्स मच्याडो**

2) वेंगॅत घेवॅान गाविला तू
जिगाळा लानपनी मॅ रडलॉ
पेटी तुई डेवरली ओट्योरनॅ तिगाळा
डेवरलॅलॉ हिंदालॉ पन रडलॉ
**- बर्नड लोपीस**

माय-लेकिआ सुखादुखाला,
हाऊ-ओशा वार्तागोष्टीला,
पोरा-पारा निज्या भूक्याला,
जकल्यांनास हिंदाळो सोबतीला...
- रचना रॉड्रिग्ज

बारके,होकरे,डोकरे
जकल्यानास याव लळॉ.
कुपारी संस्कृतीआ प्रतिक,
ओट्योर टांगलेलॉ हिंदाळॉ
-एमेल आल्मेडा

हिंदाळयायी किरकिर ऐकोन
डोळे माये जड जाले
त्यात बयसो गानो ऐकोन
मन मा भरोन आले
- आलेक्स लोपीस

## दुहरॉ दी - नावळ

1) ई तुआ प्रेम तरी काहा रे
मनातश्या मनात दाबोन ठविलेला
उद्या हाकोटे माइ नावळ निग्याशी
आन आज राती तू कबूल केलेला
**- सुनिता परेरा**

2) नावळ मायी निंगाली
ना वळोन परत बग्याशी
मम्मी, तू जा हिकविला
ता कत्तेस नाय भायाशी
**- पिंकी लेस्ली परेरा**

नवॉ शालू आण् भरलॅ डॉळॅ
जड पायान लेक हार्या साललली
मॅरॅ ऊब्या पप्पा डॉळयातनॅ जहीनी
खार्या पाण्याई नावळ निंगाली....
- ॲलेक्स मच्याडो.

अजूनपण नावळ आली गा
नवरी बग्या जा वाटाते...
तोडास मंग 'दोन उडत्या' गाण्योर
आपला बालपण नासोन घेते...
- रिबेका दोडती

ती बिदित आली गा शिमा मार्यासॉ हिवळ
ई बगॉन मा जीवाशी हॉयशी आकळ
ज्या दिहा वेहित बगिली तियी नावळ
नाय गा दुहऱ्या दिहा माला आली कावळ
- रॉडनी मोरो

## तिहरॉ दी - राट

1) बैल झुपिले राट फिरलो
पोंदळीतने पानी दांडात खिरलो
हाकोट हांज कुपारी खपलो
वाप्यावाप्याय सवसार केलो
**- एडवर्ड डिसोजा**

2) बोठ्या बायीवरसो जुनो राट
अवशीत कते नंदऱ्या पडाते
बावीवरशी ती गोडी शिस ते गिटी आंबे
मन अलगत भूतकाळात जाओन जुडाते
**- ब्रायन मेंडिस**

निज्यादो निखळी ऊखंडी खाट
हाकोटे ऊठ्यादो आयमेरीआ घाट
बाबा मिनजॅ फिरतॉ राट
आन् बय मिनजॅ खपता भाट
- ॲलेक्स मच्याडो.

गाडी बंगल्याकरीता विकिला भाट
पोरेपारे जाले मोकाट ,
आते वीहाम्बो घ्यादो न रेला भाट
जड जाले आते जिवानाओ राट
- डॉ. नॅन्सी डिमेलो

पोरींयी बय हांगाते पोरीयां बाबाला
मयनो जालो वराडाला पोरी आली नाय भेटेला
व्यायीला जाईन हांग पोरीयी खीत आले आमाला
गेलोन बगिला ते जावाय झूपले राटाला आन ती भाटाला
- नेल्सन डिमेलो

## सौथॉ दी - लाल लुगडा

1) आबोली 'कानी'आ लाल लुगडा..
'बारा हातात' आख्खा कुटुम माला...
नातोंडे पोतोंडे रडतोंडे जाले..
'बयने जकल्यानास हांदोन ठोईला..
**-रिबेका दोडती**

2) बयश्या लाल लुगड्याव वास
माला आजपन आठवाते
बयश्या हातसो पालंगो
परत खा वाटाते
**- ग्रिनल जॉनी फरगोज**

लाल लुगडा मिळाला बयसा
जुन्या कबाडा खणात,
इतिहास उबो रेलो कुटुंबाओ
भरल्या डॉळ्यात एका क्षणात.
- ब्रायन मेंडिस

भरलॅला आज जकल्या कबाड ऑबडा
हँगरला टांगलॅला जकला ब्रँडेड कपडा
हुंबडीया तळयोर काहा सॉब्यासा लाल लुगडा
ब्रँडेड कपडा हांगा, सॉबॅदॅगा त्या हांगडा
- ॲलेक्स मच्याडो.

लाल लुगड्या ओटीत
दडले कान्याव खजानो
गिळोन मानपमान
संवसार नाय मोडलो
- एडवर्ड डिसोजा

## पासवॉ दी - हमदाव

1) आंबोल्या माळीला बेगड पण भारी,
शेवत्या माळीहरी बी गुलाबायी जुडी,
करज्याव हमदाव गिथी आले लाडकी नळदुली,
आदीन सैपाकाई घाई न मंग वाटनीदो उडी...
**- रचना रॉड्रिग्ज**

2) धाड़ल्यो हमदावात
आया बायांना माळी
थोड्या दीहान तुटला
आत्ते आय माय श्यो गाळी!
**-सॅविन तुस्कानो**

माळी, गजरे आण गुलाबाए फुले
शिटीओ हमदाव हजविले खाँल्यात...
वराडाए लेमके दी रेल बावीस ...
नवरानवरी हळावल्यात मनातश्या मनात...
- रिबेका दोडती

एश्टर गुलाबे दवण्या हरी,
शेवत्या आंबोल्याओ माळी धाडते,
करज्यॉ धाडल्यॉ हमदावात जरी,
व्यान हुक्केखाजे पदरा बांदते.
- सोफीया गोन्सालवीस

डेर आलो हमदाव घेवोन
वयनीने ताता बाफात ठोविला
ताता निघाला डोळला
माळ भर्या तव होयरा हुटला
- पॅट्रिशिया गोन्सालवीस

## वेळयाआ भान

अक्करमाशे बारके लो
तू आन मायी हारकी लो,
दोगी गेल्यो बजारा
घारा आल्यो अकराला,
सैपाक जालो तेराला
धान जाला रॅवाळा,
भाजी जकली दुंमटली
पापड जकलॅ करपालॅ,
पोरे गेले चिली खादो सैपाक गेलॉ
मिंगारा,
मॅ उतरलॉ दारा ती लागली कपाळ
कुट्यादो,
आयो-बेन्यांनो धेन ठोआ वेळेआ
भान ठोआ,
होन्या हारको सौसार सुखात ठोआ.

## वाट्यावरला घर


वाट्यावरला घर सातशे बालासा
घर बॉठ्या डौलासा फुलान बायसा,
फुलान बायश्या घारा भयसॉ तबॅलॉ
दूदासॉ गलीमॉ सुलीपुडे

फुलान बायशी वाडी
केळी आंब्या फनसायी,
जाई बट मॉगऱ्यायी सापेकळी

फुलान बायश्या घराला
सोनीयासॉ हिंदाळो
त्यावर बसले लेकुरवाळी.

**- मेरी आल्मेडा, शांतीवन, निर्मळ**

**कादोडी अंकाकरता देणगी – वेरोनिका लोपीस, २०००₹ रूथ रॉड्रिग्ज - २०००₹**




## कादोडी शब्दकोडा – सॅबी परेरा

**आडवे शब्द :-** 1.) वाळलेले गवत, 3) लग्नाआधीची नवर्या मुलाची साग्रसंगीत हजामत, 5) मूस, एक मासा, 9) चिकटवण्याची क्रिया, चिपकव, 10) ओटीवरील बसण्याची दगडविटांची बैठक, 11) चिंचोके, 13) कावडीतली आडवी काठी, 14) रानमांजर, 16. नवऱ्या मुलीला पाठवावयाची वेणी आणि मिठाईची भेट, 18) जेवण भरवणे, 19) थंडीच्या दिवसात केलं जाणारं वऱ्याचं एक पक्वान्न, 20) पुरुष / तुटलेल्या केसाचा गुंता, 23) केसात माळायची वेणी, 24) डोळ्याचा एक विकार, 25) बाळ जन्मल्यानंतरचा सहावा दिवस, 26) भाताचं रोप न वाढवता थेट केलेली भात बियाणाची लागवड, ..... टाकणे, 28) स्त्रीयांचा एक आश्चर्योद्गार, 29) एक पुनरुदजीवित सुपरहिट कादोडी  नाटक (xx xx xxx xx xx), 33) स्वतः, 35) कुपाऱ्यांची फेव्हरिट भाजी (शॉर्ट फॉर्म), 37) पारशी माणूस, 39) कणेरी पिण्याचा पारंपरिक चमचा, 40) छान, 41) विहीर, 42) चुलीमुळे / दिव्यामुळे येणारी काजळी, 43) खरवस, 44) गलोल, 45) "दुमा"चे कागदोपत्री नाव

**उभे शब्द :-** 1.) नारळाचा घड, 2) म्हातारा माणूस (xxx), 4) खूप, 5) गुपचूप, 6) चव, 7) तिकीट तपासनीसचा अपभ्रंश झालेला शॉर्टफॉर्म (xx), 8) कुपारी लोकांचा तकिया कलाम, एका पुरुषाची दुसर्याशी बोलायची सुरुवात,  12) मटणाच्या रश्श्यासोबत खाल्ले जाणारे इडलीचे मोठे भावंड, 13) हुंदका, 14) विहीर, 15) भात-कणीसाची गोलाकार रास, 16) सावत्र (xxxx), 17) स्तन, 18) सोबत बांधून नेलेलं जेवण, 22) गावठी दारू गाळायची चूल, विटांची xx, 23) मासळी, 24) केळीचं पूर्ण वाढ झालेलं पान, 25) सर्दी जुकाम, 27) नाकदुऱ्या काढणे, xxxx करणे,  28) ओकारी, 29) दलाली, कमिशन, 30) ना कोवळा ना सुकलेला असा नारळ, 31) लपवा, 32) गोष्ट, कथा, 34) ॲडव्होकेटसाठी मराठी शब्द, 36) गर्विष्ठ, भाव खाणारा, 37) नववारी लुगडे म्हणजे xxx पोशाख / xxx कावा, 38) कंडक्टरसाठी मराठी शब्द, 39) ऊस, 40) सकाळची ताजी गोड ताडी




नाताळश्या हनायो खुब खुब शुभेच्छा

श्री. सचिन मेंडिस
आन कुटुंबिय

जापके, बोळींज

# नाताळश्या हनायो खुब खुब शुभेच्छा

# अर्चिस फॅशन

# नंदाखाल

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / ४२९ / ८८-८९ दिनांक ९-१२-१९८८

*१९८८ - रौप्य महोत्सवी पतपेढी - २०१३*

**आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा**

***१२ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत***

**ज्येष्ठ नागरीकांच्या ठेवीवर**

द.सा.द.शे. ७.५०% व्याजदर

**सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ७.२५% व्याजदर**

८.९०% ते १२% व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

## * घरबांधणी / फ्लॅट खरेदी द.सा.द.शे. ८.९०% व्याजदर *

**रू. ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण - द.सा.द.शे. १२% व्याजदर**

**३० नोव्हेंबर २०१७ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे**

*** भागभांडवल रू. १०.१७ कोटी** *** कर्जे रू. ९३.३६ कोटी**

*** ठेवी रू. २०९.५४ कोटी** *** गुंतवणूक रू. १५६.९० कोटी**

*** एकूण व्यवसाय रू. ३०३ कोटी** *** ढोबळ एन. पी. ए. ०.९६%**

*** दि. ३१/०३/२०१७ अखेर नफा रू. ५.३८ कोटी**

**- शाखा -**

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी |
|---|---|---|---|---|
| फोन :९८२२२२५३८७ | मो. ७२६१९१९०१२ | मो. ०८५५०९१०२६४ | मो. ७२६१९१९०१३ | मो. ०८५५०९१०६४३ |

लता जे.फोस
मुख्य कार्यकारी अधिकारी

मॅथ्यू ए. डिसोजा
उपाध्यक्ष

आशिष ए. लोपीस
अध्यक्ष

व

- संचालक मंडळ


BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
ESTD. 1918
(SCHEDULED BANK)
MERRY CHRISTMAS
and a prosperous new year
Call Toll-Free: 1800 233 6000 | www.bccb.co.in
Corporate Office: Catholic Bank Building, Papdy Naka, P.O. Papdy, Vasai - 401 207